# <u>रे.दि.मु.क्र. ७०/२०१३ मधील नि.क्र. ५ वरील आदेश</u>

प्रतिवादी यांनी स्वत: अगर अन्य कोणाहीमार्फत दावा मिळकतीचा कब्जा सनदशीर मार्गाचा अवलंब केलेशिवाय घेवू नये अगर वादींना दावा मिळकतीतून बेकायदेशीरपणे हुसकावून लावू नये अशी तुर्तातुर्त ताकीद देणेकरीता वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२) मौजे पांचगणी, ता. महाबळेश्वर, जि. सातारा येथील जमीन मिळकत सर्व्हे नं. ४०, यातील पांचगणी टेबल लॅन्ड या नावाने ओळखले जाणारे पठाराचे उत्तरेकडील कडयाचे बाजुस घाटजाई मंदीराचे वरील बाजुस असणाऱ्या 'द केव्हज' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या दोन गुहा या दाव्याचा वाद विषय आहेत. सदर मिळकतीस यापुढे 'दावा मिळकत' असे संबोधणेत येते.

३) वादीचे कथन असे की, दावा मिळकत वादीने १९८५ साली विकसीत करुन व्यवसाय करणेसाठी प्रतिवादी यांचेकडे अर्ज केला. दिनांक २१/११/१९८५ रोजी प्रतिवादीने दावा मिळकत वादी यांना व्यवसाय करणेसाठी देण्याचा ठराव मंजुर केला. त्यानंतर दिनांक १९/०२/१९८६ रोजी दावा मिळकत वादी यांच्या कब्जात दिली व तसा करारनामा प्रतिवादी यांनी वादी यांच्या लाभात करुन दिला. वादी यांनी दावा मिळकतीमध्ये विद्युत व पाणी कनेक्शन घेतले तसेच गुहेत जाणेकरीता पक्क्या जिन्याचे बांधकाम केले. वादीने सदर दावा मिळकतीचे नुतणीकरण करणेकरीता मोठा खर्च केलेला आहे. तसेच दुसऱ्या गुहेत जाण्याकरीता पठार खोदुन सुमारे ३० फुट लांबीचा बोगदा तयार केला आहे. दावा मिळकत ही वादीने पर्यटन स्थळ म्हणुन विकसीत केलेली आहे ती पाहणेकरीता हजारो पर्यटक येत असतात. वादीने प्रतिवादी यांच्या संमतीने डेनडाईन रेस्टॉरंट सुरु केले आहे व त्याकरीता लागणारा परवाना योग्य त्या सक्षम अधिकाऱ्याकडून घेतलेला आहे. नगरपालिकेतील पक्षीय राजकारणामुळे काही व्यक्ती व नगरसेवक वादींना दावा मिळकतीतून हुसकावून लावणेचा प्रयत्न करीत आहेत. दावा मिळकतीमध्ये वादी यांचा प्रत्यक्ष कब्जा आहे त्यामुळे वादी हे प्रतिवादीचा दावा मिळकतीबाबत irrevocable licensee झालेला आहे. त्यामुळे दावा मिळकतीचा कब्जा घेणेचा प्रतिवादी यांना अधिकार नाही. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीचा कब्जा घेण्याचा प्रयत्न केला त्यामुळे वादीने प्रतिवादी यांचेविरुध्द वाई येथील न्यायालयात रे.दि.मु.

क्र. २३४/१९८८ हा दावा दाखल केला. दरम्यानचे काळात वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये समझोता झाला त्यामुळे वादीने सदरचा दावा नवीन दावा दाखल करणेच्या अटीवर दिनांक २१/०४/१९९७ रोजी काढून घेतला. प्रतिवादी यांनी दिनांक २९/०६/१९९९ रोजी वादीला नोटीस दिली त्यामुळे वादीने प्रतिवादी यांचेविरुध्द रे.दि.मु.क्र. २३३/१९९९ हा दावा जाहीर ठरावाकरीता व निरंतर मनाईकरीता दाखल केला. सदरचा दावा महाबळेश्वर न्यायालयात वर्ग झाला त्याचा नंबर रे.दि.मु.क्र. ७१/२०१० असा देणेत आला. सदरचा दावा दिनांक २५/०३/२०११ रोजी रद्द करणेत आला.

४) वादी यांनी सदर निर्णयावर मा. जिल्हा न्यायालय, सातारा यांच्या न्यायालयात रे.दि.अपील क्र. १३३/२०११ दाखल केले. सदर अपील दिनांक १८/१०/२०१२ रोजी अंशत: मान्य केले. प्रतिवादी हे दावा मिळकतीतील कब्जा वादींकडून सनदशीर मार्गाने घेईपर्यंत प्रतिवादी यांनी स्वत: अगर तिऱ्हाईत इसमामार्फत वादीच्या दावा मिळकतीतील कब्जे वहिवाटीस हरकत करु नये अशी निरंतर मनाईची ताकीद सदर निर्णयाने देण्यात आली असल्याचे दिसुन येते. सदर निर्णयावर प्रतिवादी यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये अपील दाखल केले नाही. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीचा कब्जा घेण्याकरीता आज तारखेअखेर कोणतीही सनदशीर मार्गाने कारवाई वादीविरुध्द केलेली नाही. त्यामुळे दावा मिळकतीचा कब्जा वादी यांच्याकडे आहे. दिनांक ०४/१०/२०१३ रोजी प्रतिवादीने वादीस रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठवून दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादीस द्यावा अन्यथा आहे त्या परिस्थितीत दावा मिळकत प्रतिवादी आपल्या ताब्यात घेतील अशी बेकायदेशीर नोटीस पाठविली. सदरची नोटीस ही न्यायालयाच्या हुकूमाचा अवमान करणारी आहे. सदर नोटीस दिल्यानंतर प्रतिवादीचे कर्मचारी व काही नगरसेवक दावा मिळकतीमध्ये येवून वादीस हुसकावून लावणेची भाषा करीत आहेत. प्रतिवादी हे दावा मिळकतीतील वादी यांचा कब्जा बेकायदेशीररित्या घेण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. तसे झाल्यास वादीचे पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तसेच वादीच्या कायदेशीर हक्कावर गदा येणार आहे. वादी यांना सकृतदर्शनी केस आहे, न्यायाचा समतोल वादीच्या लाभात आहे त्यामुळे प्रतिवादी अगर त्यांच्यातर्फे कोणीही सनदशीर मार्गाचा अवलंब केल्याशिवाय वादींना दावा

मिळकतीतून बेकायदेशीरपणे हुसकावून लावू नये म्हणुन तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी अशी वादी यांनी मागणी केली आहे.

५) प्रतिवादी यांनी नि.क्र. ३९ वर कैफियत व तुर्तातुर्त ताकीद अर्जास म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी यांनी दाव्यातील व तुर्तातुर्त ताकीद अर्जातील कथनांचा साफ इन्कार केलेला आहे. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी दिनांक ०४/१०/२०१३ रोजी वादी यांना कायदेशीर नोटीस पाठविलेली आहे व प्रतिवादी हे दावा मिळकतीतील गुहेचा ताबा घेणेकरीता कायदेशीर कारवाई करीत आहेत. सदर वादी हा दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचा भाडेपट्टेदार नाही. त्यांना दावा मिळकत ताब्यात ठेवण्याचा कोणताही अधिकार नाही. दावा मिळकतीची मालकी ही प्रतिवादी यांची आहे. सदरची दावा मिळकत ही भौगोलिक व ऐतिहासीक महत्व असलेली पुरातत्व वास्तु आहे. सदर दावा मिळकतीच्या नैसर्गिक स्वरुपात फेरबदल अनुज्ञेय नाही. सदर दावा मिळकतीच्या व पठाराच्या बाबतीत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी आदेश केलेले आहेत.

६) दिनांक २१/११/१९८५ रोजी अटी व शर्तीवर दावा मिळकत तात्पुरत्या वापरासाठी वादी यांना दिलेली होती. दिनांक १९/०२/१९८६ च्या करारनाम्याप्रमाणे ३ वर्षांच्या कालावधीकरीता दावा मिळकत वापरण्याची परवानगी वादींना दिलेली होती. सदर करारनाम्याप्रमाणे गुहा वापरणेचा कालावधी दिनांक १८/०२/१९८९ रोजी संपुष्टात आलेला आहे त्यामुळे वादी हे कराराप्रमाणे भाडेपट्टेदार राहिलेले नाहीत. वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द रे.दि.मु.क्र. ७१/२०१० हा दावा दाखल केलेला होता. सदरचा दावा खर्चासह दिनांक २५/०३/२०११ रोजी नामंजुर करणेत आला. त्यावर वादी यांनी मा. जिल्हा न्यायालयात रे.दि.अपील क्र. १३३/२०११ हे दाखल केले होते. ते अंशतः मंजुर करण्यात आले व नगरपालिकेने दावा मिळकतीचा कब्जा सनदशीर मार्गाने घ्यावा असा हुकूम केलेला आहे. त्या अनुषंगे प्रतिवादी यांनी दिनांक ०४/१०/२०१३ रोजी कायदेशीर नोटीस वादी यांना पाठविलेली आहे. वादी हा न्यायालयासमोर स्वच्छ हाताने आलेला नाही. वादी यांची मागणी कायद्याने टिकणारी नाही. सदर प्रतिवादी यांनी न्यायालयाच्या हुकूमाचा अवमान केलेला नाही. तसा अवमान करण्याचा हेतू प्रतिवादी यांचा नव्हता व नाही. वादीच्या दाव्यास res-

judicata या तत्वाची बाधा येते. वादी यांनी करारनाम्यातील अटींचा भंग केलेला आहे तसेच ठरल्याप्रमाणे प्रत्येक महिन्याची फी वादी यांनी भरलेली नाही. अतिवृष्टीमुळे गुहांमध्ये पाणी पाझरुन गुहा मनुष्य वापरास व वस्तीस धोकादायक झालेल्या आहेत त्यामुळे जिवीत व वित्त हानी होण्याची भिती आहे. वादी यांचा दावा कायदेशीर नाही. तसेच दाव्यास कोणतेही कारण घडलेली नाही. प्रतिवादी यांनी न्यायालयाच्या हुकूमाप्रमाणे सनदशीर मार्गाचा अवलंब करुन दावा मिळकतीचा कब्जा वादीकडून घेण्याची कायदेशीर कारवाई सुरु केली आहे. सबब वादी यांचा दावा खर्चासह नामंजुर करणेत यावा.

७) कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीतर्फे विधीज्ञ श्री. काळे यांचा युक्तीवाद ऐकला व लेखी युक्तीवाद नि.क्र.३३अ चे अवलोकन केले. प्रतिवादी यांचे विधीज्ञ सौ. जायकर यांचा युक्तीवाद ऐकला व लेखी युक्तीवाद नि. क्र.४५ चे अवलोकन केले. प्रकरणातील सर्व परिस्थितीचा विचार करता पुढील मुद्दे माझे विचारात निघतात. त्यांना मी माझी कारणांसहीत उत्तरे यापुढे नमुद करीत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| (१) | वादी यांना सकृतदर्शनी केस आहे असे वादीने शाबीत केले आहे का ? | नाही |
| (२) | न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे असे वादीने शाबीत केले आहे का ? | नाही |
| (३) | वादीने मागणी केलेप्रमाणे तुर्तातुर्त ताकीद न दिलेस त्याचे अपरिमित नुकसान होणार आहे असे वादीने शाबीत केले आहे का ? | नाही |
| (४) | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

८) मुद्दा क्र. १ ते ४ करीता :—

सदरचे मुद्दे एकमेकांशी संलग्न असलेने सोयीस्कर विवेचनाकरीता मी ते एकत्र विचारार्थ घेत आहे.

९) वादीतर्फे युक्तीवाद करणेत आला की, दावा मिळकतीमध्ये वादी हे भाडेपट्टेदार आहेत. सदर वादी यांनी दावा मिळकतीच्या विकासाकरीता भरपूर रक्कम खर्च केलेली आहे. सदर वादी यांचा दावा मिळकतीमध्ये कायदेशीर ताबेकब्जा आहे. प्रतिवादी यांनी वादी यांचेकडून दावा मिळकतीचा ताबा कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन घेण्यात यावा अशी निरंतर मनाईची ताकीद वादी यांच्या लाभात देण्यात आलेली आहे. सदर प्रतिवादी यांनी वादी यांच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करण्याच्या उद्देशाने तसेच दावा मिळकतीचा ताबा बेकायदेशीर उद्देशाने घेण्याच्या उद्देशाने नोटीस पाठविलेली आहे. तसेच प्रतिवादी यांचे कर्मचारी व नगरसेवक वादी यांच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत. प्रतिवादी यांनी कायदेशीर तरतुदीचा अवलंब करुन वादी यांचेकडून कब्जा घेणेचा आहे. प्रतिवादी यांनी दिलेली नोटीस ही बेकायदेशीर स्वरुपाची आहे. वादी यांनी त्यांच्या युक्तीवादाच्या समर्थनार्थ खालील न्यायनिर्णय दाखल केलेले आहेत.

(i) *"Rame Gowda Vs. M. Varadappa Naidu, AIR 2004 Supreme Court 4609, 2004(1) Supreme Court Cases 769, 2014 ALL SCR (O.C.C.) 257"*

(ii) *"Maria Margarida Sequeria Fernandes and Ors. Vs. Erasmo Jack de Sequeria, AIR 2012 Supreme Court 1727"*

(iii) *"Krishna Ram Mahale Vs. Mrs. Shobha Venkat Rao, 1989(3) Bom.C.R. 364 [Supreme Court]"*

(iv) *"Nana Tukaram Jaikar Vs. Sonabai and others, AIR 1982 Bombay 437"*

१०) प्रतिवादी यांच्यातर्फे युक्तीवाद करणेत आला की, प्रतिवादी यांच्यामार्फत दिलेली नोटीस ही कायदेशीर कार्यवाहीचा भाग आहे. वादी हा नगर परिषदेचा भाडेपट्टेदार नाही. त्यामुळे वादींचा दावा मिळकतीतील कब्जा कायदेशीर नाही. वादी यांनी दिनांक १९/०२/१९८६ रोजी च्या करारनाम्यातील अट क्र. १,

७, ८, ९ चा भंग केलेला आहे. वादी हा न्यायालयासमोर स्वच्छ हाताने आलेला नाही. दावा मिळकतीचा ताबा प्रतिवादी यांना देणेचा नसलेने वादीने प्रस्तुतचा दावा हा खोटेपणाने दाखल केलेला आहे. दावा मिळकतीतील गुहा धोकादायक झालेली आहे. तसेच पांचगणी भिलार या भागामध्ये जमीन खचण्याचे प्रकार घडत आहेत. त्यामुळे सदरच्या गुहा मनुष्य वस्तीस धोकादायक झालेल्या आहेत. प्रतिवादी हे वादी यांच्याकडून दावा मिळकतीचा ताबा कायदेशीर तरतूदींचा अवलंब करुन घेत आहेत. त्यास वादी यांना हरकत करता येणार नाही. त्यामुळे वादींचा अर्ज नामंजुर करणेत यावा.

११) अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दावा मिळकत ही प्रतिवादी यांच्या मालकीची आहे. सदरची मिळकत प्रतिवादी यांनी वादी यांना भाडेतत्वाने दिनांक १९/०२/१९८६ रोजी दिलेली होती व सदरचा करार हा ३ वर्षांच्या कालावधीकरीता होता. सदर वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द रे.दि.मु.क्र. ७१/२०१० हा दावा दाखल केला होता. दावा मिळकतीमध्ये वादी हे प्रतिवादी यांचे कधीही रद्द न होणारे भाडेपट्टेदार आहेत असे जाहीर होवून मिळणेकरीता तसेच प्रतिवादी यांनी वादी यांच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणुन निरंतर मनाईकरीता दाखल केलेला होता. सदरचा दावा नामंजुर करणेत आला आहे. तसेच वादी यांनी सदर न्यायनिर्णयाविरुध्द मा. जिल्हा न्यायालय, सातारा येथे रे.दि.अपील क्र. १३३/२०११ हे दाखल केले होते. सदर अपील अंशत: मंजुर करण्यात आले. प्रतिवादी अगर त्यांच्यातर्फे कोणीही दावा मिळकतीचा ताबा सनदशीर मार्गाने घेईपर्यंत प्रतिवादी यांचेविरुध्द निरंतर मनाईचा हुकूम देण्यात आलेला आहे. तसेच दावा मिळकतीमध्ये वादी हे कधीही रद्द न होणारे भाडेपट्टेदार आहेत ही वादी यांची मागणी अमान्य करण्यात आलेली आहे. या सर्व बाबी वादी प्रतिवादी यांना मान्य आहेत.

१२) अभिलेखावरील सर्व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी यांनी फेरिस्त नि.क्र.४/५ ला रे.दि.मु.क्र. ७१/२०१० या न्यायनिर्णयाची नक्कल दाखल केलेली आहे. सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दावा मिळकतीमध्ये वादी हे प्रतिवादी यांचे कधीही रद्द न होणारे भाडेपट्टेदार आहेत असे जाहीर होवून मिळणेकरीता तसेच प्रतिवादी यांनी

वादी यांच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणुन निरंतर मनाईकरीता दाखल केलेला होता. सदरचा दावा नामंजुर करणेत आला. वादी यांनी फेरिस्त नि.क्र. ४/६ ला रे.दि.अपील क्र. १३३/२०११ मधील न्यायनिर्णयाची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी यांचे अपील अंशत: मंजुर करण्यात आले. वादी हे दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचे कधीही रद्द न होणारे भाडेपट्टेदार आहेत ही वादी यांची मागणी नामंजुर करण्यात आली आहे असे दिसुन येते. तसेच दावा मिळकतीमध्ये वादी यांचा कब्जा आहे असा निष्कर्ष काढण्यात येवून दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादी यांनी कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन घेईपर्यंत प्रतिवादी यांचेविरुध्द निरंतर मनाईचा हुकूम केला असल्याचे दिसुन येते.

१३) वादी यांच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी हे कायदेशीर मार्गाचा अवलंब न करता दावा मिळकतीचा कब्जा वादी यांचेकडून घेण्याच्या उद्देशाने दिनांक ०४/१०/२०१३ रोजी प्रतिवादी यांनी नोटीस पाठविली आहे. प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी हे वादी यांचेकडून कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन तसेच रे. दि.अपील क्र. १३३/२०११ च्या निर्णयास अधीन राहून कब्जा घेण्याची कार्यवाही करीत आहेत. वादी यांचा संपुर्ण कागदोपत्री पुरावा पाहिला असता प्रतिवादी यांनी दावा मिळकतीचा ताबा बळजबरीने अथवा बेकायदेशीर तरतूदींचा अवलंब करुन घेणेचा प्रयत्न केला असे सकृतदर्शनी दर्शविणारा कसलाही पुरावा वादी यांनी दाखल केलेला नाही. वादी यांनी फेरिस्त नि.क्र. १७ सोबत दिनांक १९/११/२०१३ रोजीच्या दैनिक पुढारीच्या अंकाची प्रत दाखल केली आहे. त्यामध्ये पान क्र. १ वरील बातमीचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी हे टेबललॅन्डवरील अनाधिकृत स्टॉल व अतिक्रमणे हटवत आहेत. सदर बातमीमध्ये कोठेही नमुद नाही की, प्रतिवादी यांनी वादी यांच्या ताब्यात असलेल्या मिळकतीमध्ये घुसणेचा प्रयत्न केला अथवा त्याबाबत कोणतीही कारवाई केली. वास्तविक वादी यांच्या लाभात निरंतर मनाईचा हुकूम आहे ज्या हुकूमाने प्रतिवादी यांना कायदेशीर तरतूदीचा अवलंब करुन दावा मिळकतीचा कब्जा घेण्याबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत. वास्तविक वादी यांच्या लाभात निरंतर मनाईचा हुकूम असताना प्रतिवादी यांनी वादी यांचेकडून गैरहक्काने अथवा

कायदेशीर मार्गाचा अवलंब न करता कब्जा घेणेचा प्रयत्न केल्यास वादी यांना प्रतिवादी यांच्याविरुध्द न्यायालयाच्या हुकूमाच्या अवमानाबाबत कायदेशीर कारवाई करता येईल तसेच प्रतिवादी यांनी रे.दि.अपील क्र. १३३/२०११ च्या निर्णयाप्रमाणे कारवाई केली नाही तर वादी यांना त्याबाबत प्रतिवादी यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करण्याचा अधिकार आहे. अशा परिस्थितीत वादी यांच्या लाभात निरंतर मनाईचा हुकूम असताना पुन्हा तुर्तातुर्त ताकीद देणेची कोणतीही आवश्यक्ता नाही. प्रभावकारी उपाय असेल तर निरंतर मनाईचा हुकूम देण्यात येवू नये अशी तरतूद Specific Relief Act Section 41(h) मध्ये आहे. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द निरंतर मनाईकरीता दाखल केलेला आहे. सदर वादी यांच्या लाभात सदर मिळकतीबाबत प्रतिवादी यांचेविरुध्द निरंतर मनाईचा हुकूम अस्तित्वात आहे. अशा परिस्थितीमध्ये सदर मिळकतीबाबत त्याच प्रतिवादीविरुध्द पुन्हा नव्याने निरंतर मनाईचा हुकूम देता येणार नाही. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीचा ताबा कायदेशीर तरतुदींचा अवलंब करुन घ्यावा अशा प्रकारची निरंतर मनाई मा. जिल्हा न्यायालय, सातारा यांनी वादी यांच्या लाभात दिलेली आहे. सदर निरंतर मनाईच्या हुकूमाची जाणीव व ज्ञान प्रतिवादी यांना आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी यांनी कायदेशीर तरतूदींचा अवलंब न केल्यास प्रतिवादी यांचेविरुध्द न्यायालयीन निर्णयाचे पालन न केल्याबाबत कारवाई होवू शकते याचे ज्ञान आहे. तसेच प्रतिवादी हे वादी यांचेकडून कायदेशीर मार्गाचा अवलंब न करता कब्जा घेवू लागले तर त्याबाबत वादी यांना अन्य योग्य तो कायदेशीर मार्ग उपलब्ध आहे त्यामुळे पुन्हा तुर्तातुर्त ताकीद मनाई हुकूम देणे न्यायाच्या दृष्टीने उचीत होणार नाही असे मला वाटते.

१४) वादी यांनी दाखल केलल्या न्यायनिर्णयांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर न्यायनिर्णयातील बाबी व प्रस्तुत खटल्यातील बाबी भिन्न स्वरुपाच्या आहेत. सदरच्या न्यायनिर्णयामध्ये असे निरिक्षण नोंदविणेत आले आहे की, जर एखाद्या व्यक्तीचा मिळकतीमध्ये settled possession असेल तर कायदेशीर तरतूदींचा अवलंब केल्याशिवाय त्यास मिळकतीतून हुसकावून लावता येणार नाही अथवा त्याच्या ताब्यातून मिळकतीचा कब्जा घेता येणार नाही. सदर खटल्यातील बाबींचा विचार केला असता असे दिसुन येते की, सदर दावा मिळकतीमध्ये वादी यांचा कब्जा आहे असे गृहीत धरण्यात आले आहे. तसेच

प्रतिवादी यांना दावा मिळकतीचा कब्जा कायदेशीर तरतूदींचा अवलंब केल्याशिवाय घेता येणार नाही असा निरंतर मनाईचा हुकूम वादी यांच्या लाभात केलेला आहे. या सर्व बाबींचा विचार केला असता वादीतर्फे दाखल करण्यात आलेले न्यायनिर्णय प्रस्तुतच्या खटल्यास लागू होत नाहीत असे माझे नम्र मत आहे.

१५) अभिलेखावरील सर्व कागदोपत्री पुराव्यांचा विचार केला असता मला असे वाटते की, वादी यांना सकृतदर्शनी केस नाही. तसेच वादी यांच्या लाभात न्यायाचा समतोल नाही. वादी यांच्या मागणीप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूम न दिल्यास वादी यांचे पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार नाही असे मला वाटते. त्यामुळे मी असे गृहीत धरतो की, वादी यांना सकृतदर्शनी केस आहे, न्यायाचा समतोल वादी यांच्या लाभात आहे तसेच तुर्तातुर्त मनाई हुकूम न केल्यास वादी यांचे पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहे या बाबी वादी यांनी शाबीत केलेल्या नाहीत. त्यामुळे मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे व मुद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

(१) वादी यांचा अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

(२) वादी यांच्या लाभात जैसे थे चा केलेला अंतरिम आदेश रद्द करण्यात येत आहे.

(३) खर्चाची बाब अंतिम निर्णयावेळी निर्णीत केली जाईल.

दिनांक :— १०/११/२०१४
महाबळेश्वर.

(रा.शां.रोटे)
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
महाबळेश्वर